# राज्य माहिती आयोग, मुख्यालय, मुंबई

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ (१) अन्वये**
**दाखल केलेली तक्रार**

माहितीचा अधिकार

## क्र.मुमाआ/नों.क्र.१३९/२२/त.क्र.३१/२५/०१

**Mr. Bilal Shafiullah Khan**
Room No.7, Masjid Dargah Compound,
Opposite Nirmal Park, Dr. B. A. Road,
Mumbai 400027

**विरुद्ध**

**जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी (इ. प्र.) शहर**
बृहन्मुंबई महानरपालिका,कार्यकारी अभियंता (इ.प्र.) शहर-१ यांचे कार्यालय,
नविन महापालिका इमारत भगवान वाल्मिकी चौक, विद्यालंकार मार्ग,
हनुमान मंदिरच्या समोर, साल्ट पॅन रोड, अन्टॉप हिल, वडाळा पूर्व मुंबई- ४०० ०३७.

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता (इ.प्र) शहर-२**
बृहन्मुंबई महानरपालिका,कार्यकारी अभियंता (इ.प्र.) शहर-१ यांचे कार्यालय,
नविन महापालिका इमारत भगवान वाल्मिकी चौक, विद्यालंकार मार्ग,
हनुमान मंदिरच्या समोर, साल्ट पॅन रोड, अन्टॉप हिल, वडाळा पूर्व मुंबई- ४०० ०३७.

**तक्रार अर्ज सुनावणी दिनांक : २२.०८.२०२५**

| | | |
|---|---|---|
| तक्रारदार | : | अनुपस्थित |
| विद्यमान जन माहिती अधिकारी | : | उपस्थित |
| प्रथम अपिलीय अधिकारी | : | अनुपस्थित |

सदर तक्रार आज दि.२२.०८.२०२५ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली असून सुनावणी दरम्यान तक्रारदार अनुपस्थित आहेत. विद्यमान जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी (इमारत प्रस्ताव) शहर, श्री. विनायक माने उपस्थित आहेत. विद्यमान प्रथम अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता (इमारत प्रस्ताव) शहर-२ अनुपस्थित आहेत.

या तक्रार संदर्भातील कागदपत्रांचे अवलोकन केल्यावर आयोग या निष्कर्षावर येत आहे की, प्रस्तुत तक्रारदार श्री. बिलाल खान यांनी अपील क्र.१६९/२१ यात दि.०१.०३.२०२१ रोजी झालेल्या आदेशाचे अनुपालन झाले नसल्याचा आक्षेप नोंदवीत माहितीचा अधिकारी अधिनियम, २००५ यातील कलम १८ अन्वये प्रस्तुत तक्रार अर्ज दाखल केलेला असून, यात कठोर कारवाई करण्याबाबत विनंती करण्यात आलेली आहे. प्रस्तुत प्रकरणी विद्यमान जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी (इमारत प्रस्ताव) शहर यांनी या यासंदर्भातील माहितीही संकेतस्थळावर उपलब्ध असल्याचे नमूद केले असून उपरोक्त माहितीही तक्रारदार यांना या आधीच प्रदान करण्यात आली असल्याचे नमूद केलेले आहे. खरतर माहितीचा अधिकारी अधिनियम,

२००५ यातील कलम १८ अन्वये तक्रार अर्जांवर माहिती देण्याचा आदेश देणे अपेक्षित नसले तरी तत्कालीन मा.मुख्य माहिती आयुक्त यांनी पारित केलेल्या आदेशाच्या अनुषंगाने कार्यालयीन अभिलेखात उपलब्ध असलेली माहिती तक्रारदार यांना निशुल्क देण्याबाबत आदेशाचे अनुपालन झाले असल्याबाबत अहवाल सादर करण्याच्या निर्देशासह प्रस्तुत तक्रार अर्ज निकाली काढून नस्तीबद्ध करण्यात येत आहे.

**आदेश**

**वरील तक्रार अर्ज निकाली काढण्यात येत आहे.**

**ठिकाण : मुंबई**
**दिनांक : २२.०८.२०२५**

**( राहुल भा. पांडे )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

State Information Commission Maharashtra